# देगलूर महाविद्यालयाचे विद्यार्थी लातूरच्या विभागीय शिबिरात चमकले

**देगलूर/प्रतिनिधी**

शिक्षण उपसंचालक कार्यालय लातूर आणि राष्ट्रीय सेवा योजना +२ च्या वतीने नेरली जिल्हा नांदेड येथे लातूर विभागीय विद्यार्थी नेतृत्व गुण विकास शिबिरात देगलूर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवीत आपले कलागुण सादर केले.

नांदेड जवळ असलेल्या नेरली येथील 'नंदनवन' कुष्ठधाम येथे लातूर विभागीय विद्यार्थी नेतृत्व विकास शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.यात धनश्री येरगूलवार हिला जिल्हा उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले.

या शिबिरास अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी संतोष वानोळे तसेच श्रीमती ए.एस.देबडवार यांनी ऐश्वर्या ऐकलारे, धनश्री अरगुलवार, वेदिका बाचीपले, अस्मिता पलकोंडवार, रूपाली स्वामी, पुजा जुक्कावाड या विद्यार्थीनींनी सहभाग नोंदविला होता.

दि. १९ जानेवारी रोजी शुक्रवारी व २० जानेवारी रोजी शनिवारी झालेल्या दोन दिवसीय विकास शिबिरात 'युवक नेतृत्वाची उभारणी' या विषयावर माजी उपसंचालक शिक्षण नंदन नागरे , 'राष्ट्रीय सेवा योजना व युवक नेतृत्व' या विषयावर डॉ. मारुती लुटे तसेच बालाजीराव थोटवे यांनी 'नवीन शैक्षणिक धोरण' या विषयावर विचार व्यक्त केले. यानंतर झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात देगलूर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवीत आपले कलागुण सादर केले. समारोप प्रसंगी डॉ. दत्तात्रेय मठपती तसेच गोविंद नांदेडे, डॉ. संदीप जगदाळे यांनी मार्गदर्शन केले. या शिबीरात जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. धनश्री येरगुलवारचे अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, उपाध्यक्ष नारायणराव मैलागीरे, सचिव शशीकांत चिद्रावार, सहसचिव सूर्यकांतराव नारलावार, कोषाध्यक्ष विलासशेठ तोटावार, कार्यकारीणी सदस्य राजकुमार महाजन, देवेंद्र मोतेवार, गंगाधरराव जोशी, रविंद्रअप्पा द्याडे,डॉ. कर्मवीर उनग्रतवार, जनार्दन चिद्रावार, चद्रकांत नारलावार, प्राचार्य डॉ.मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य प्रा. उत्तमकुमार कांबळे, पर्यवेक्षक संग्राम पाटील, कार्यालयीन अधीक्षक गोविंद जोशी नळगीरकर आदींनी कौतुक केले आहे.

Scanned with OKEN Scanner